**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा. संपत माधव त्रिभुवन
भिमार्थ, इंगळेनगर, सिध्दार्थ कॉलनी,
वारजे नाका, वारजे, पुणे-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-७

**जन माहिती अधिकारी** पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४१ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | १७.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-७ डॉ. माणिक जाधव

**जन माहिती अधिकारी** पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-७ श्रीमती अरूणा विजय चव्हाण

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पुणे विद्यापीठाच्या रसायन शास्त्र विभागात शैक्षणिक वर्ष सन १९९६-९७ ते शैक्षणिक वर्ष सन २००५-२००६ मध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संवर्गनिहाय (एससी/एसटी / एनटी / व्हीजेएनटी / ओबीसी / ओपन ) आणि संबंधित विद्यार्थ्यांचे बी.एस्सी चे व एम.एस्सी, फिजिकल केमिस्ट्री, इनऑर्गनीक केमिस्ट्री, ऑर्गनिक केमिस्ट्री, अॅनालायटीकल केमिस्ट्री, बायो केमिस्ट्री ) च्या गुणांच्या यादीची

साक्षांकित प्रत, पुणे विद्यापीठाचे रसायन शास्त्र विभागातील प्रा. श्रीधर गेज्जी यांनी शैक्षणिक वर्ष २००४-२००५ ते शैक्षणिक वर्ष २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात शिकविलेले विषय आणि त्या विषयांच्या तपासलेल्या उत्तर पत्रिकांच्या सांक्षाकित प्रती ( प्रात्यक्षिक परीक्षा आणि लेखी परीक्षा प्रत्येक शैक्षणिक वर्षातील सर्व )

## विवेचन

पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात सन १९९६- १९९७ ते २००५-२००६ मध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या संबंधातील माहितीची व प्रा. श्रीधर गेज्जी यांनी सन २००४ ते २००६ मध्ये तपासलेल्या उत्तर - पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी अपीलकर्ता प्रा. संपत माधव त्रिभुवन यांनी जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, यांच्याकडे केली होती. उत्तर पत्रिकांच्या सांक्षाकित प्रतींव्यतिरिक्तची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच सन २००३ ते २००६ या काळातील गुणांच्या यादीबाबतची माहिती पूर्वीही दिल्याचे नमूद केले. परंतु अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरून श्री. त्रिभुवन यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णया योग्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. उत्तरपत्रिकांच्या प्रती अध्यादेश क्र.१४९(८) व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(१)(e) व (i) मधील तरतुदीनुसार नाकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय त्यांनी योग्य ठरविला व गुणांबाबतची माहिती परीक्षा विभागात तपासणीसाठी उपलब्ध असल्याचे आदेशात नमूद केले. परंतु अपूर्ण माहिती मिळाल्याच्या कारणावरून प्रा. त्रिभुवन यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

प्रा. त्रिभुवन यांना हवी असलेली माहिती दिली आहे. गुणांच्या याद्या आदींसाठी अभिलेख तपासणी करण्यास मंजुरी दिलेली होती, परंतु त्यांनी संपर्क साधला नाही. तसेच विद्यापीठाच्या पूर्वीच्या नियमांनुसार उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी नाकारली होती. परंतु दि. १२.३.२००८ रोजी प्रसिध्द झालेल्या नवीन सुधारित अध्यादेशानुसार सर्व परीक्षांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यापूर्वीच्या अध्यादेशानुसार उत्तरपत्रिका नष्ट केल्या आहेत. प्रा. त्रिभुवन यांना हवी असलेली सर्व

माहिती वेळोवेळी देण्यात येत असून कोणतीही माहिती देण्याची तयारी आहे, मात्र ते नंतर संपर्क साधत नाहीत, त्यांनी अभिलेखाच्या अवलोकनासाठी विद्यापीठाशी संपर्क साधला नाही, असे जन माहिती अधिकारी श्रीमती अरूणा विजय चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ डॉ. माणिक जाधव यांनी लेखी व तोंडी नमूद केले. अभिलेखाच्या अवलोकनाबाबत अपीलकर्त्यास कळवून पूर्तता अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास त्यांनी संबंधित अभिलेखाचे अवलोकन करावयास हवे होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रघुनाथ तुकाराम पाटील
मु.पो.आसुर्ले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संचालक ~~मंडळ~~ व मॅनेजर,
श्री हनुमान सहकारी पाणीपुरवठा संस्था ~~मंडळी~~ लि., आसुर्ले,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६ /कोल्हा/ २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.सी.एस.कटरे

**जन माहिती अधिकारी** तथा संचालक ~~मंडळ~~ व मॅनेजर,
श्री हनुमान सहकारी पाणीपुरवठा संस्था ~~मंडळी~~ लि. आसुर्ले,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर तर्फे सचिव, श्री.महादेरे निवृत्ती सुतार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.९.३००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>संस्थेच्या मॅनेजर नेमणुकीचा ठराव, वेतनाचा ठराव, अॅड.इंगळे यांचे नेमणुकीबाबत ठराव, नेमणुकीपासून आज तारखेपर्यंत कोणकोणत्या कामात किती फी अदा केली याची व्हौचर्स, वकिलांच्या नेमणुकीच्या सभेचा अजेंडा, गणेश पाईपला कोणत्या तारखेस किती रक्कम दिली, संस्थेस इमारतीसाठी जमीन खरेदीचा दस्त प्रत ७/१२ उतारा, संस्थेचे इमारत बांधकाम, प्लॅन व इंजिनिअर एस्टीमेट, दि.३०.६.२००६ अखेर पाझर व पाटाच्या पाण्याची थक यादी, संथेच्या शासकीय माहिती अधिकारी नेमणूक ठराव, सन २००० ते ३०.६.२००६ अखेर रु.१०,०००/- चे वर रोख जमा पावतीची छायांकित व सदर रक्कम किर्दीला खर्च पडलेले व्हौचर छायांकित प्रती व नकला. | |

## विवेचन

श्री हनुमान सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित, आसुर्ले यांचे 'संचालक मंडळ व मॅनेजर' याच्याकडे ११ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. रघुनाथ तुकाराम पाटील यांनी मागितली होती. आपल्या संस्थेला शासकीय मदत मिळत नाही व संस्थेचे संचालक मंडळ अगर मॅनेजर यांची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झालेली नाही, असे नमूद करुन संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी श्री.पाटील यांचा अर्ज निकाली काढला. तसेच श्री.पाटील यांच्याकडे थकबाकी असून त्याबद्दल संस्थेने दावा दाखल केला आहे. ती बाकी प्रथम भरावी, असेही अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी या पत्रात म्हटले आहे. आपल्याला माहिती न दिल्याच्या कारणावरुन श्री.पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केल. मागितलली माहिती संस्थेने दिली आहे व श्री.पाटील यांनी केलेले अपील मुदतीत नाही, या कारणावरुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

राज्य माहिती आयोगाच्या विचारणेनंतर आपण संस्थेने दिलेल्या माहितीच्या प्रतीची मागणी संस्थेकडे केली. परंतु अपीलकर्त्यास यापूर्वी ती माहिती देण्यात आलेली आहे. तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.८.२.२००६ च्या परिपत्रकानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्या संस्थेला लागू होत नाही, असे संस्थेच्या व्यवस्थापकांनी दि.६.१०.२००७ रोजी आपल्याला कळविले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी दि.९.१०.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्या संस्थेला लागू नाही, तसेच द्यावयाची माहिती अपीलकर्त्याने अनेकदा मागितली असून वेळोवेळी ती त्यांना देण्यात आली आहे. अपीलकर्ता हे संस्थेचे थकबाकीदार असून पुनः पुन्हा ती माहिती मागत असतात. अपीलकर्त्याचे वडील (कै.तुकाराम हरी पाटील) यांनी संस्थेविरुध्द कोल्हापूरच्या सहकार न्यायालयात दावा दाखल केला असून अपीलकर्ता त्यात हजर आहेत. विषय न्यायप्रविष्ट आहे. सन २००० ते २००६ एवढ्या कालावधीतील कागदपत्रे त्यांना हवी आहेत, परंतु सहकार कायद्यानुसार आवश्यक ती नक्कल शुल्क भरुन ते मागणी करीत नाहीत व नक्कल शुल्क भरत नाहीत. संस्थेची थकबाकी वसूल झाल्याशिवाय त्यांच्या अर्जाचा विचार करु नये असे संस्थेचे म्हणणे आहे. तसेच श्री भैरव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, आसुर्ले या संस्थेतील ठेवीदाराच्या ठेवी परत करण्याच्या संदर्भात तिचे संस्थापक-व्यवस्थापक असेलेले, व संदर्भित अपिलातील अपीलकर्ता श्री.रघुनाथ तुकाराम पाटील यांना एक वर्ष साध्या कैदेची शिक्षा जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांनी दि.२१.६.२००८ रोजी ठोठावली आहे, असे निवेदन संस्थेच्या वकील श्रीमती तृप्ती चेंदाते व सचिव श्री.महादेरे सुतार यांनी संबंधित कागदपत्राच्या प्रतीसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व संस्थेने सादर केलेली अपीलकर्त्यास दिलेल्या माहितीची प्रत पाहता संस्थेने अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती दिलेली आहे. तसेच अंतर्गत वादासाठी अपीलकर्ता माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत, असे दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये हे अपेक्षित नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंदराव बळवंतराव निकम
१६६/१, महावीरनगर, हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
यशवंत सहकारी औद्योगिक वसाहत लि., हुपरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९ / कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आनंदराव बळवंतराव निकम
१६६/१, महावीरनगर, हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती निलिमा गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.९.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | मौजे हुपरी येथील यशवंत औद्योगिक सहकारी वसाहत लि., हुपरी या संस्थेतील ऑफिस रिपेअरिंग व कमान बांधकामाबाबत नोटीस काढून निविदा मागविल्या त्याची माहिती, बांधकामाच्या संचालकांच्या मंजुरीच्या ठरावाची लेखी माहिती, सभासदांना भाडेपट्ट्याने वाटप केलेल्या प्लॉटवर बांधलेल्या इमारतीत सभासदांनी पोट भाडेकरुन ठेवलेले आहेत याची पहाणी करुन सविस्तर माहिती. प्लॉट नं.११२ हा संस्थेच्या कब्जात आहे किंवा कसे. इतरांकडे असल्यास त्याचा भाडेपट्टा करार केला आहे की नाही, संस्थेची पंचवार्षिक निवडणूक होऊन संस्था मतदार संघातून कोणाची निवड केली आहे, केली नसल्यास कधी करणार व कोणत्या संस्थेच्या प्रतिनधींची नियुक्ती करणार आहात. |

## विवेचन

श्री यशवंत औद्योगिक सहकारी वसाहत लि., हुपरी या संस्थेकडील बांधकामविषयक निविदा, भाडेपट्ट्याने वाटप केलेल्या भूखंडावरील पोटभाडेकरु आदीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, श्री यशवंत औद्योगिक सहकारी वसाहत लि., हुपरी यांनी दिली नाही, अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांच्या आदेशानुसार दिलेली माहितीही 'लबाडीची' व खोटी आहे, अशा कारणावरुन अपीलकर्ता श्री.आनंदराव बळवंत निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही. माहिती मुदतीत व पूर्ण देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी प्रपत्रात नमूद केले. अपीलकर्ता गैरहजर होते. त्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

आपल्याला खोटी माहिती मिळाली असून औद्योगिक सहकारी वसाहतीची जागा असताना काही नावे वगळून माहिती दिली. संस्थेच्या सभासदांनी पोटभाडेकरु ठेवू नयेत असा संस्थेचा नियम असताना अनेकांनी पोटभाडेकरु ठेवले आहेत. संस्थेच्या संचालकांनी आपल्याच नातेवाइकांना जागा दिल्या आहेत, असा आरोप श्री.निकम यांनी केला. तसेच सविस्तर लेखी निवेदन सादर

करण्यासाठी पुढील तारीख देण्याची विनंती श्री.निकम यांनी केली. परंतु, ऑक्टोबर २००७ मध्ये जन माहिती अधिकाऱ्यांनी वकील देण्यासाठी व अपीलकर्त्याने 'ग्रामपंचायत निवडणुकीतील प्रचारात व्यस्त असल्यामुळे पुराव्याचे कागद प्राप्त करुन घेण्याकरिता' एक महिन्याची मुदतवाढ मागितली. आयोगाने ती दिली. दि.१३.५.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ची सूचना देऊनही अपीलकर्ता गैरहजर होते. लेखी म्हणणे सादर करण्यासाठी पुरेशी मुदत यापूर्वीच उपलब्ध असताना अपीलकर्त्याने कोणतेही निवेदन सादर केलेले नाही, त्यामुळे पुढील तारखेची विनंती आयोगाने अमान्य केली व अपीलकर्ता यांनी चार दिवसात लेखी निवेदन सादर करावे, असे निर्देश दिले.

श्री.निकम यांच्या मागणीप्रमाणे त्यांना पूर्ण माहिती देण्यात आली असल्याचे व प्रामुख्याने माहितीची जबाबदारी संस्थेची असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले श्रीमती निलिमा गायकवाड यांनी केले.

श्री.निकम यांना मूळ अर्जानुसार विहित मुदतीत माहिती देण्यात आली होती. मात्र निविदेबाबतची त्यांची मागणी स्पष्ट नव्हती. मुद्दा क्र.३ नुसार प्रत्यक्ष प्लॉटवर जाऊन पाहणी करुन किती सभासदांनी पोटभाडेकरु ठेवलेले आहेत, त्यांची माहिती मिळावी अशी मागणी केली होती. मुद्दा क्र.५ मध्ये 'जर-तर'च्या स्वरुपाची व संभाव्य निर्णयाची माहिती मागितली होती. 'मुद्दा क्र.३ बाबतची माहिती संस्थेने गोळा करुन द्यावी, अशी अपेक्षा नसली तरी सदरच्या पोटभाडेकरुंबाबतची माहिती संस्थेकडे असणे गरजेचे आहे. संस्थेचे रेकॉर्ड त्वरित अद्ययावत करुन द्यावे,' असा निर्णय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.अरुण काकडे यानी दिला होता. त्यानुसार संस्थेचे कर्मचारी श्री.अनिल वंदुरे यांना सूचना देऊन समक्ष जागेवर पाहणी करुन माहिती दिली. ती पूर्णतः खरी असल्याचे प्रतिज्ञापत्र त्यांनी सादर केले आहे. संस्थेकडील प्लॉट क्र.११२ बद्दलची माहिती श्री.निकम यांनी मागितली होती, परंतु त्यांनी स्वतःच या प्लॉटसंबंधी सहकार न्यायालयात दावा केला असून तो प्रलंबित आहे. त्याबाबतची उपलब्ध माहिती त्यांना देण्यात आली. माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचा व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर संगनमताचा आरोप श्री.निकम

यांनी केला आहे, परंतु त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी दिलेले नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे लेखी निवेदन त्यांचे वकील श्री.एस.व्ही.दरीबे यांनी सादर केले.

श्री.निकम यांनी आयोगाने दिलेल्या मुदतीत व त्यानंतरही लेखी निवेदन सादर केलेले नाही, तसेच माहितीत काय चुकीचे व दिशाभूल करणारे आहे, हेही नेमके स्पष्ट केलेले नाही. संस्थेमधील जागावाटप, त्याचा वापर याबाबत श्री.निकम यांनी केलेले आरोप हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ६.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन ज्ञानदेव धोत्रे
मु.वाडीपीर, ता.करवीर, पो.वाशी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७० /कोल्हा/ २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोहन ज्ञानदेव धोत्रे
मु.वाडीपीर, ता.करवीर, पो.वाशी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.सतीश राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.शरद पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.११.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे वाशी, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथील जुना व.नं.११७/२ (नवीन गट नं.१९८/२ ) या क्षेत्राचा सुरुवातीचा ७/१२ उतारा हा सन १९४९-५० सालाचा असून त्याला श्री.विठू लक्ष्मण धोत्रे यांचे नाव कसे लागले व कोणत्या अभिलेखाच्या आधारे लागले याची माहिती. | |

## विवेचन

मौजे वाशी येथील आपल्या वडिलांच्या नावाच्या जमिनीला श्री.विठू लक्ष्मण धोत्रे यांचे नाव कसे लागले, याबाबतची कागदपत्रे आपल्याला मिळावी, अशी मागणी श्री.मोहन ज्ञानदेव धोत्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

आयोगाच्या दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

संबंधित जमिनीचा कबजा आजही आपल्या वडिलांच्या नावे आहे. नकाशा वडिलांच्या नावाचा असताना ७/१२ दुसऱ्याच्या नावाचा कसा झाला, ही माहिती आपल्याला दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री.धोत्रे यांनी केले. संबंधित जमिनीबाबत न्यायालयाचा मनाई हुकूम असल्याचे आणि न्यायालयातील दाव्यासाठी आपल्याला सदर कागदपत्रे हवी असल्याचे श्री.धोत्रे यांचे वडील श्री.ज्ञानदेव देवबा धोत्रे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. 'क,ड,ई' पत्रकाप्रमाणे श्री.विठ्ठल लक्ष्मण धोत्रे यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. अपीलकर्त्याला संबंधित अभिलेख दाखविण्यात आले असून त्यांचे समाधान होत नाही. 'ड' पत्रक जीर्ण झाले असल्याने त्याच्या छायांकित प्रती देता येणार नाहीत, मात्र ती अवलोकनासाठी सादर करता येईल,

हे स्पष्ट करण्यात आलेले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, करवीर यांनी लेखी व तोंडी नमूद केले. सन १९४३ चा स.नं.११७ चा हिस्सा फॉर्म पाहता तीन पोटहिस्से झाल्याचे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, करवीर यांनी श्री.धोत्रे यांना कळविलेले दिसते. पोटहिश्श्याचा नकाशा हा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचा अभिलेख असून तो आपल्या कार्यालयाच्या अभिलेखाचा भाग नाही, असेही जन माहिती अधिकारी श्री.शरद पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

भूमी अभिलेख नकाशाप्रमाणे ७/१२ तयार होतो, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. परंतु ७/१२ हा 'क,ड,ई' पत्रकाप्रमाणे होत असतो. 'ई' पत्रकाप्रमाणे अपीलकर्ता यांची जमीन असती किंवा वहिवाट असती तर त्यांचे नाव जमिनीला लागले असते हे त्यांना वेळोवेळी स्पष्ट करुन सांगण्यात आलेले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, करवीर श्री.सतीश राऊत यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.४.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७६६/ २००९/ पुणे | श्री.नरेंद्र दळवी ७१०/अ/११, शालीमार बिल्डिंग, गुरुनानक नगर, शंकरशेठ रोड, पुणे-४२ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१, व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५ फायनान्स रोड, शासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालय इमारत, २ रा मजला, पुणे-१ | नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१ | मुद्रांक शुल्क चुकविलेप्रकरणी कारवाई सुरु असलेल्या १२१५ प्रकरणांबाबतची माहिती सर्व कागदपत्रे | अपीलकर्त्याने माहिती मागितलेला विषय हा सार्वजनिक हिताचा आहे. त्यामुळे त्रयस्थ पक्षाची असली तरी अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकन करु देऊन, आवश्यक असलेली माहिती शुल्क भरुन घेऊन ८ दिवसात अपीलकर्त्यास द्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ८०९/ २००९/ पुणे | श्री.किरण शांताराम भोसले<br>२९७, मुकादम मळा, जोगवडी, पो.मावडी क.प., ता.बारामती, पुणे | सचिव, जोगवडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., जोगवडी, पो.मावडी क.प., ता.बारामती, पुणे | सहायक निबंधक सहकारी संस्था बारामती, ता.बारामती, जि.पुणे | सदर संस्थेची स्थापना, नोंदणी, कार्यकारी संचालक मंडळातील व्यक्तींच्या नावांची यादी, संस्थेचे कामकाज इ. अनुषंगिक एकूण १० मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत विहित मुद्रांक शुल्क (रु.२०/-) जोडलेले नाही. |
| ३ | ८१०/ २००९/ पुणे | श्री.हमीद माणिक शेख<br>स.नं.३०/७/२, घर नं.२८०, कृष्ण पणन सोसायटी समोर, मु.पो.आंबेगाव बु ाा, जि.पुणे-४६ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय भोर, ता.भोर, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय भोर, ता.भोर, जि.पुणे | निवृत्तीवेतन व शासकीय फायदे एक वर्षे होऊन गेले तरी मिळालेले नाहीत. त्यावरील झालेल्या खर्चासाठी व मनःस्तापासाठी व्याज, रक्कम मिळावी, इ.४ मुद्दे | अपीलकर्त्याने मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, हे जन माहिती अधिकारी यांनी दि. निरंक .५.२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य आहे. मात्र संबंधित विषयाबाबतच्या सद्यस्थितीची माहिती अपीलकर्त्यास ८ दिवसांत कळवावी. |
| ४ | ८४९/ २००९/ पुणे | श्री.बापूराव चंद्रशेखर गावडे<br>मेडद, ता.बारामती, | माहिती अधिकारी, पुणे गृहनिर्माण व | अपिलीय प्राधिकारी, पुणे गृहनिर्माण व | मौजे मेडद येथील योजनेनुसार सन २००४ चे | माहितीचा अधिकार अधिनियम, |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जि.पुणे | क्षेत्रविकास मंडळ, आगरकरनगर, पुणे-१ | क्षेत्रविकास मंडळ, आगरकरनगर, पुणे-१ | जाहीरातीनुसार प्राप्त अर्जदारांची नावे व पत्ते, भूखंड वाटप इ. मुद्दयांची माहिती | २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक ७६६/२००९/पुणे, ८०९/२००९/पुणे, ८१०/२००९/पुणे व ८४९/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. ७६६/२००९/पुणे व ८१०/२००९/पुणे मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**
**दिनांक :२६ -०८-२००९**

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अब्दुलगणी करीमसाहेब मुल्ला
अध्यक्ष, मुस्लीम जमात वडणगे, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी(ग्रामपंचायत),
पंचायत समिती करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८ / कोल्हापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९. ७ .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अब्दुलगणी करीमसाहेब मुल्ला
अध्यक्ष, मुस्लीम जमात वडणगे, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी(ग्रामपंचायत),
पंचायत समिती करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. --.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे वडणगे, ता.करवीर येथील ग्रामसेवक श्री.के.बी.पाटील यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीच्या चौकशीची माहिती. दि.१०.४.२००७ च्या पत्रानुसार समक्ष हजर राहून ग्रामपंचायत वडणगे तर्फे ग्रामसेवक श्री.के.बी.पाटील, सरपंच, माजी सरपंच यांनी जे म्हणणे दिले आहे त्याची, तसेच याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर यांनी दिलेल्या चौकशी अहवालाची प्रत, अहवाल दिलेला नसेल तर तो सादर करताच त्याची प्रत. | |

## विवेचन

मौजे वडणगे, ता.करवीर येथील मिळकत सीटीएस क्र.८९ च्या संदर्भातील कर आकारणी रजिस्टर व अन्य नोंदींबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.अब्दुलगणी करीमसाहेब मुल्ला यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन ती न मिळाल्याच्या व दिशाभूल केली जात असल्याच्या कारणावरुन श्री.मुल्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, वडणगे यांनी माहिती दिली. तसेच या अनुषंगाने केलेल्या चौकशीच्याअहवालाच्या प्रतीही अपीलकर्त्यास देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. परंतु दिलेली माहिती खोटी, दिशाभूल करणारी असून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत कार्यवाही क़ेली नाही. मूळ विषयाबाबत वेगळी तक्रार करण्यास सांगून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, ते कायद्याला धरुन नाही म्हणून शास्ती व अन्य कारवाई व्हावी, असे श्री.मुल्ला यांनी नमूद केले.

माहिती दिली आहे, मात्र मूळ विषयाबाबत श्री.मुल्ला यांनी वेगळी तक्रार केली असून त्याची चौकशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या पातळीवर सुरु आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती करवीर यांनी नमूद केले.

याच मिळकतीच्या याच विषयाचया संदर्भातील श्री.मुल्ला यांच्या अपील क्र.२४३/कोल्हापूर मध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार दि.१६.६.२००८ संबंधित चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास निःशुल्क उपलब्ध करुन देण्याचा आदेश जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती करवीर यांना आयोगाने दिला होता.

याच अनुषंगाने याच विषयाबाबत श्री.मुल्ला यांनी प्रभारी ग्रामविकास अधिकारी श्री.के.बी.पाटील यांच्याकडे माहिती मागणारा अर्ज केला. त्यांनी दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्यामुळे आपण तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.आर.के.बामणे यांच्याकडे अपील केले. परंतु विस्तार अधिकारी, पंचायत समिती हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घेऊन अपील करावे, अशा कारणावरुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, म्हणून आपण विस्तार अधिकाऱ्यांकडून माहिती मागविली, त्यांनी पूर्वीचीच माहिती दिली. परंतु ती खोटी, दिशाभूल करणारी व संबंधित मूळ विषयातील कार्यवाही बेकायदेशीरपणे केलेली असल्यामुळे संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी आपण अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केली. या तक्रारीबाबत वेगळा अर्ज दिल्यास चौकशी करु, असे त्यांनी सांगितल्यामुळे आपण पुरवणी-म्हणणे सादर केले, तरीही त्यांनी अपील फेटाळले. त्यानंतर आपण तक्रार अर्ज सादर केला, त्याची चौकशी झाली नाही. त्यांच्या निर्णयाची वाट पाहात राहिल्यामुळे आपल्याला आयोगाकडे अपील करण्यास विहित मुदतीपेक्षा विलंब झाला, असे लेखी व तोंडी प्रतिपादन करुन श्री.मुल्ला यांनी विलंब क्षमापिंत करण्याची विनंती केली.

'मुस्लीम समाजाच्या मिळकतीत सिटी सर्व्हे झाला असल्याने ग्रामपंचायतीला अधिकार नसताना ग्रामविकास अधिकारी श्री.के.बी.पाटील यांनी काही ग्रामपंचायत सदस्यांच्या मदतीने संदर्भित मालमत्तेसंदर्भात बेकायदेशीर ठराव करुन कागदोपत्री नोंदी केल्या, फेरफार केले, त्याचा

कर वसूल केला, तो कोणत्या कायद्याने याची माहिती आपल्याला मिळावी,' अशी मागणी श्री.मुल्ला यांनी राज्य माहिती आयोगासमोरील सुनावणीत केली. ग्रामपंचायत कायद्यानुसार करवसुली केली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री.एल.बी.मिसाळ यांनी सांगितले. श्री.मुल्ला यांनी मागितलेली माहिती दिली आहे. बेकायदेशीर नोंदीच्याबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीवर स्वतंत्रपणे चौकशी जिल्हा परिषदेने केली आहे, असे श्री.मिसाळ यांनी नमूद केले. ज्या ग्रामसेवकांनी चुकीच्या नोंदी केल्या त्यांच्याविरुध्द-म्हणजे श्री.के.बी.पाटील यांच्याविरुध्द कारवाई सुरु झालेली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.ओमराज गहाणे यांनी सांगितले. मूळ कागदपत्रांनुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली. करआकारणी सदरी झालेल्या नोंदीबाबत विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करवीर यांनी चौकशी केली. श्री.मुल्ला यांनी तो अहवाल मान्य न केल्यामुळे आजरा येथील विस्तार अधिकारी, श्री.एस.ए.सावंत यांची संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमणूक करण्यात आली. त्यांनी केलेल्या चौकशीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी चौकशी पथक नेमून संपूर्ण चौकशी केली, त्यानुसार श्री.के.बी.पाटील यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली व त्यांनी खुलासा सादर केला. त्यांची एक वेतनवाढ कायमपणे बंद करण्याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, कोल्हापूर यांच्याकडे प्रस्तावित केली आहे. दरम्यान सिटी सर्व्हे क्र.८९ बाबत दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कोल्हापूर यांच्याकडे अनेक दावे प्रलंबित आहेत. त्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत कोणत्याही प्रकारे कसलाही फेरबदल न करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.ओमराज गहाणे यांनी लेखी व तोंडी विस्ताराने नमूद केले. राज्य माहिती आयुक्तांकडे दाखल केलेल्या अपिलावर अपीलकर्त्याने श्री.अब्दुलगणी करीमसाहेब मुल्ला, अध्यक्ष, मुस्लीम जमात, वडणगे अशी सही केली आहे. तथापि मुस्लिम जमात, वडणगे या नावाचा कोणतीही न्यास नोंद झाल्याचे आढळ होत नाही, असा दाखला सार्वजनिक न्यास

नोंदणी कार्यालय, कोल्हापूर यानी दिला आहे, असेही श्री.गहाणे यांनी या अहवालात नमूद केले आहे.

श्री.मुल्ला यांची मुख्य तक्रार मिळकतीला बेकायदेशीरपणे व खोट्या नोंदी केल्याची आहे. त्याबाबतच्या कारवाईची वा नोंदी दुरुस्त करण्याची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत येत नाही. तसेच संबंधित विषयात न्यायालयात दावे दाखल आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपेक्षित कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अरविंद गजानन कुलकणी — अपीलकर्ता
मुंबई -पुणे रस्ता, नाशिक फाटा, कासारवाडी, पुणे-३४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, — उत्तरवादी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. सुभाष डुंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे डॉ.नागकुमार राजेंद्र कुणचगी

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दि. ५.३.२००५ या पत्रात उल्लेखिल्याप्रमाणे 'मे. हॉटेल गंगोत्री'चा परवाना मंजूर करण्यात आला होता, तो दि.१०.५.२००२ रोजी रद्द करण्यात आला होता. या आदेशाविरूध्द परवानाधारक श्री. बाळकृष्ण शेट्टी यांनी मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता, त्याचा पिटिशन क्रमांक व कागदपत्रे, उच्च न्यायालयाच्या दि. १०.५.२००२ चा रद्द परवाना नूतनीकरण आदेशाची प्रत

## विवेचन

हॉटेलच्या अन्न परवाना नुतनीकरणाच्या अनुषंगाने श्री. बाळकृष्ण शेट्टी यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचा क्रमांक व अन्य कागदपत्रे मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. अरविंद गजानन कुलकर्णी यांनी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कागदपत्रे दिली व उच्च न्यायालयाकडील कागदपत्रांबाबत उच्च न्यायालयाशी संपर्क साधावा, असे कळविले. त्या विरोधात श्री. कुलकर्णी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांच्याकडे अपील केले. मुख्य अन्न निरीक्षक यांनी श्री. कुलकर्णी यांना न्यायालयाच्या आदेशाची प्रत दिली असून त्यातच दाव्याचा क्रमांक नमूद आहे, असे नमूद करून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य ठरवून अपिलीय प्राधिकारी यांनी श्री. कुलकर्णी यांचे अपील फेटाळले. त्या विरूध्द श्री. कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्या मालकीच्या इमारतीत श्री. शेट्टी यांचे हॉटेल असून त्यांचा अन्न परवाना रद्द केल्यानंतरही आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयाला दिशाभूल करणारे प्रतिज्ञापत्र सादर केले व रद्द परवान्याचे नूतनीकरण केले. त्यामुळे आपले नुकसान झाले. सन १९९१ पासून आरोग्य वैद्यकीय अधिकारी अशा प्रकारे बेकायदा वर्तन करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री. कुलकर्णी यांनी केले. मात्र उच्च न्यायालयापुढे केलेले प्रतिज्ञापत्र योग्य की अयोग्य, आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रशासकीय कार्यवाही कायदेशीर की बेकायदेशीर या विषयीचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७.८.२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७९७ / सांगली | श्री.तुकाराम पांडुरंग ऐवळे मु.बागेवाडी, पो. कुंभारी , ता. जत, जिल्हा सांगली | अध्यक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता समिती जलस्वराज्य प्रकल्प, बागेवाडी, ता.जत , जिल्हा सांगली | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जल स्वराज प्रकल्प जिल्हा परिषद, सांगली | बागेवाडी येथील जलस्वराज्य योजनेच्या कामाबाबत एकूण २७ मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि. ७.२.२००९ रोजी झालेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमातील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९१५ / सांगली | श्री.गोपाळ देवराम खाडीलकर विजापूर वेस, खाडिलकर गल्ली, ब्राम्हणपुरी, मिरज , जि.सांगली | कार्यकारी संचालक, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या; सांगली , ता.मिरज, जिल्हा सांगली | प्रादेशिक सह संचालक (साखर) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | १. कारखान्याच्या सर्व आजी व माजी संचालक, चेअरमन यांच्याकडून कोणकोणत्या प्रकारचे किती व केंव्हापासून येणे आहे. त्याची तपशीलवार माहिती<br>२. सदर येणे रक्कम वसुलीबाबत काय कार्यवाही केली , याची माहिती | दि. १८.३.२००९ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत 'कार्यक्रमात ठरल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. १८.४.२००९ रोजी माहिती दिली. सदर माहिती अपीलकर्त्यास देण्यास झालेल्या विलंबासंदर्भात जन माहिती अधिकारी श्री. विक्रमसिंह शि. सरनोबत, प्रभारी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कार्यकारी संचालक, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली यांना सक्त ताकिद देण्यात येत आहे. |
| ३ | १०२८/ सांगली | श्री.शिवाजी महादेव जावीर मु.पो.नेलकरंजी, ता.आटपाडी, जि.सांगली | उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सांगली | शिंदेवाडी व सातपुते वस्ती, तळेवाडी येथील अंगणवाडी पदासाठीच्या निवडप्रक्रियेवर स्थगिती आणणे | १. अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत.<br>२. मूळ अर्जातील विषय हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| ४ | ८३७ / २००९ / सांगली | श्री. ईरगोंडा शिवगोंडा बाळीकाई शिव-निळा भवन, वॉर्ड नं. ६ , जत, जि.सांगली | मंडल अधिकारी, जत विभाग, जत, जि.सांगली | तहसीलदार, जत, जि. सांगली | १. प्लॉट नं. ७२ (७५) चा सारा कशाच्या आधारे वसूल केला ? १९२७ च्या नकाशा व प्लॉट नंबर बदलाचा खुलासा<br>२. गाव कामगार तलाठी यांनी केलेली नोंद मंडल अधिकारी यांनी रद्द का केली, प्लॉटबाबत वारसांनी दिलेली कोर्ट ऑर्डरची प्रत इ. माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | ८३९ / २००९ / सांगली | देवेंद्र काशिनाथ सहस्त्रबुध्दे अवधूत सावरकर कॉलनी, मार्ग क्र.२, | १. सहायक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली | कार्यकारी अभियंता, शहर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.शहर विभाग, | १. विश्रामबाग करीता सध्याच्या व्यवस्थेव्यतिरीक्त काळ्याखणीवरील टाकीतून पाणी घेण्याचा प्रस्ताव | १. अपिलासोबत आवश्यक मुद्रांकशुल्क (रु.२०) जोडलेले नाही.<br>२. अपीलकर्त्याने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विश्रामबाग , सांगली | २. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | सांगली | आहे का ? व तदनुषंगिक एकूण ७ मुद्दयांची माहिती २. दि.२८.४.०६ च्या पत्रामध्ये विश्रामबाग योजना दोन महिन्यात कार्यान्वित होईल, असे कळविले होते. सदर योजना अद्यापही सुरु झालेली नाही. विश्रामबागसाठी सुधारीत पाणी पुरवठा योजना होणार आहे का, कधी ? ३. योजनेकरिता मंजूर अनुदानाची रक्कम, इ. एकूण ९ मुद्दयांची माहिती | अनेक माहिती अर्जांसाठी (तीन ) एकच अपील आयोगाकडे केले आहे. प्रत्येक माहिती अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील सादर करणे आवश्यक आहे. ३.संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिलेली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र.७९७ / सांगली, ९१५ / सांगली, १०२८ / सांगली, ८३७ / २००९ / सांगली, व ८३९ / २००९ / सांगली ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०३.०८.२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खलीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८०८/ २००९/ सातारा | श्री. सत्वशील धैर्यशील शेळके मु.पो. लोणंद (इंद्रप्रस्थ बिल्डींग शिरवळ रोड), ता. खंडाळा, जि.सातारा | जन माहिती आधिकारी तथा महसूल अव्वल कारकून क्रमांक -१, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मु.पो. व ता. वाई, जि.सातारा | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वाई, मु.पो. व ता. वाई, जि.सातारा | दि. २३.०७.२००७ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांची संपूर्ण टिपणीची प्रमाणित नक्कल तसेच दि. ०५.०१.२००१ ते १०.०१.२००१ च्या आवक रजिस्टरच्या पानाची झेरॉक्स प्रत | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १८.७.२००९ रोजी काढलेले आदेश योग्य आहेत. |
| २ | ८४४ / २००९/ सातारा | श्री. अे.बी. मोदी प्लॉट नं. २३, सर्व्हे नं. १९०अ, गोडोली, मोरे कॉलनी, सातारा | जन माहिती आधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) | पदोन्नतीबाबतचा मानीव दिनांक मंजूरी आदेश मिळणेबाबत | अपिलकर्त्याने मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी ही प्रशासकीय स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे-४११००६ | पुणे-४११००६ | | अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे -

आदेश

वरील तक्त्यातील एकूण दोन अपिले अनुक्रमांक १ व २ (अपील क्र. ८०८/ २००९/ सातारा, ८४४ / २००९/ सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-०८-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नामदेव शामराव नालंदे
शिंदे बिल्डिंग, व्हिल कॉलनी, बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१९ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४ . ६ .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नामदेव शामराव नालंदे
शिंदे बिल्डिंग, व्हिल कॉलनी, बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एस.जी.साबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.२.२००७ व १७.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माळेगाव सहकारी साखर कारखाना लि., शिवनगर, ता.बारामती या कारखान्याच्या सेट वॉशपासून बायोगॅस निर्मिती प्रकल्प व मंजूरीबाबत (सन २००१ ते २००७)<br>मंजूरीसाठी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, मंजूरी देण्यापूर्वी अटी व शर्तीची प्रत, प्रोजेक्ट रिपोर्ट कोणत्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वा विशेष साधारण सभेत ठराव मंजूर झाला त्या ठरावाची प्रत, प्रकल्पास सहकारी कायद्याच्या कोणत्या कलमान्वये मंजूरी देण्यात आली, अधिनियमाची प्रत, ठराव वार्षिक सर्वसाधारण सभा किंवा साधारण सभेत मंजूर झाला नसल्यास व नवीन संचालक मंडळाने हा विषय नामंजूर केल्यास प्रकल्पासाठी खर्च केलेल्या रकमेची जबाबदारी कोणाची व कोणती, यासंबंधी सभासदांच्या होणाऱ्या नुकसानीबाबत साखर आयुक्तांचे अधिकार व सहकारी कायद्यातील तरतुदीची प्रत व पुढील कार्यवाहीची माहिती. |
|---|---|

## विवेचन

माळेगाव सहकारी साखर कारखाना लि., शिवनगर, ता.बारामती यांच्या बायोगॅस निर्मिती प्रकल्पाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.नामदेव शामराव नालंदे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक(प्रशासन), साखर आयुक्तालय यांच्याकडे मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.डी.बी.गावीत, सहसंचालक (प्रशासन) यांना संबंधित कारखान्याचे कार्यकारी संचालक हे जन माहिती अधिकारी नियुक्त केले असल्याने त्यांच्याशी संपर्क साधून माहिती घेण्यास कळविले. श्री.नालंदे यांनी केलेल्या अपिलाची दखल अपिलीय प्राधिकारी तथा संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय यांनी घेतली नाही म्हणून श्री.नालंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

प्रपत्रातील नोंदी व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता श्री.नालंदे यांनी मागितलेली काही माहिती साखर कारखान्याच्या कक्षेतील आहे. परंतु बायोगॅस प्रकल्प मंजूरीसाठी

साखर आयुक्तालयाशी केलेला पत्रव्यवहार यासारख्या बाबी साखर आयुक्तालयाच्या कक्षेतील आहेत. मात्र अपीलकर्त्यांने जन माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रानुसार साखर कारखान्याकडे अर्ज केला नाही व त्यांच्याशी संपर्क साधला नाही. तसेच श्री.गावीत अपिलीय प्राधिकारी म्हणूनही काम पहात होते व आपण अपिलीय प्राधिकारी झाल्यानंतर प्रथमच आपल्या निदर्शनास हा विषय येत आहे, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.एस.जी.साबळे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. या संदर्भात आयोगाने केलेल्या पत्रव्यवहारानंतर श्री.गावीत यांनी श्री.नालंदे यांना मुद्देनिहाय पृष्ठसंख्या नमूद करुन शुल्क भरण्यास कळविले होते. परंतु श्री.नालंदे यांनी शुल्क भरले नाही व पुढील कार्यवाही केली नाही, असे श्री.साबळे यांनी प्रपत्रात नमूद केले.

वरील बाबी पाहता जन माहिती अधिकारी श्री.गावीत व अपीलकर्ता श्री.नालंदे या दोघांनीही योग्य कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. श्री.गावीत यांना याबाबत योग्य कारवाई करण्याची समज देण्यात येत आहे. श्री.नालंदे यांनी आवश्यक बाबींची पूर्तता करणे, तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उपस्थित राहणे आवश्यक होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्ता श्री.नामदेव शामराव नालंदे यांना संपूर्ण माहिती निःशुल्क देणे आवश्यक असून होणारे शुल्क तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.डी.बी.गावीत यांनी स्वतः भरावे व यानुसार कार्यवाही केल्याचा अहवाल दि.१५.९.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड.खतीब वकील
असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट प्रॅक्टिसिंग बिफोर द
चॅरिटी कमिशनर ऑफ महाराष्ट्र, १३०/१६, सोलापूर,
झेड.पी.पी.ओ. सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड,
उत्तर सदर बझार, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड,
उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३+८४+८५+८६+८७/सोलापूर/२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

सर्व गैरहजर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.१०.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोलापूर येथील तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री.वाय.जी.बोराडे यांनी मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० च्या कलम २०,२२,२२अ,५०अ नुसार दि.१.४.२००३ ते ३१.३.२००४ या काळात दिलेल्या अंतिम निर्णयाच्या प्रती. | |

## विवेचन

सोलापूर येथील तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री.वाय.जी.बोराडे यांनी मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० च्या कलम २०,२२,२२अ,५०अ नुसार दि.१.४.२००३ ते ३१.३.२००४ या काळात दिलेल्या अंतिम निर्णयांची तपशीलवार माहिती जन माहिती अधिका-यांकडून मिळाली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री.ए.एम.अंबळकर यांनी अपिलांची योग्य प्रकारे दखल न घेता अपिले फेटाळली, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.खतीब वकील यांनी पाच अपिले राज्य माहिती आयोगाकडे दाखल केली आहेत.

दि.१७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. या तारखेला अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यापैकी कोणीही हजर नसल्याने अपिलांची सुनावणी ठेवण्यात आली. परंतु त्या दिवशीही सर्व गैरहजर होते. आपण दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय व्हावा, अशी विनंती अपीलकर्ता श्री.खतीब वकील यांनी दि.१९.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला केली.

सोलापूरचे तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री.वाय.जी.बोराडे यांनी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विविध कालखंडातील माहिती श्री.खतीब वकील यांनी असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट्स प्रॅक्टिसिंग बिफोर द चॅरिटी कमिशनर्स ऑफ महाराष्ट्र, सोलापूर या संस्थेचे अध्यक्ष या नात्याने संस्थेतर्फे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, सोलापूर यांनी माहिती दिली नाही. सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयातील

भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून जाणूनबुजून व हेतुत: त्यांनी ही माहिती दडवली, असे नमूद करुन श्री.खतीब वकील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांच्याकडे अपील केले. मागितलेली माहिती कोणताही नेमका तपशील न देता व अत्यंत संदिग्ध स्वरुपात मागितलेली आहे. चौकशी प्रकरणाचे क्रमांक, तारीख आदी सर्वच तपशील त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडूनच अपेक्षित केला आहे. त्याचे स्वरुप लक्षात घेता अशा प्रकारची माहिती संकलित करणे व पुरविणे व्यवहारत: शक्य नाही, या निष्कर्षाने अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री.ए.एम.अंबळकर यांनी काढला. अधीक्षक पदाचा (जन माहिती अधिकारी पदाचा) अतिरिक्त कार्यभार लेखापाल यांच्याकडे होता. श्री.खतीब वकील यांनी मागितल्याप्रमाणे सर्व तपशील निश्चित करुन शोधून माहिती देणे शक्य नसल्याचे त्यांचे म्हणणे श्री.अंबळकर यांनी मान्य केले व श्री.खतीब वकील यांची अपिले फेटाळली.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे, श्री.खतीब वकील यांनी केलेल्या महितीच्या मागणीचे स्वरुप व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी श्री.अंबळकर यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. अपीलकर्त्याने नेमक्या स्वरुपात माहिती मागणे आवश्यक आहे.

'अशा प्रकारच्या निर्णयाaबाबतची संपूर्ण नोंद असणारे नोंदपुस्तक ठेवणे मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५१ च्या नियम १५ अन्वये बंधनकारक आहे. तसे ते ठेवले असते तर आपल्याला हव्या असलेल्या प्रती देणे शक्य झाले असते,' असे श्री.खतीब वकील यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. परंतु अशा प्रकारे कायद्याने बंधनकारक असलेल्या नोंदी ठेवल्या नसल्यास त्याबाबत कारवाई करणे हा या अपिलाच्या कक्षेतील विषय नाही. मात्र श्री.खतीब वकील यांनी नमूद केल्याप्रमाणे नोंदपुस्तकाचे बंधन असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये अशा प्रकारची माहिती नागरिकांसाठी सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंस्फूर्तीने कायमस्वरुपी उपलब्ध ठेवली पाहिजे, याची दखल घेऊन आवश्यक ती उपाय योजना संबंधित

सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख म्हणून सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यानी करणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये माहिती जाहीर / उपलब्ध करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांनी १५ दिवसात आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८३५/ २००९ पुणे | श्री. अंबादास चंद्रकांत उंडे ७४/१९, प्राधिकरण, आकुर्डी-चिखली रोड, कोयनानगर, चिंचवड, पुणे-१९ | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१४, पार्वती हाईट्स, लांडेवाडी चौक, भोसरी, पुणे-३९ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, ५, फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, पहिला मजला, पुणे-१ | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१४ यांच्या कार्यालयात नोंद झालेल्या व स्कॅन केलेल्या एकूण १८ दस्तांच्या प्रती एका सी.डी.वर कॉपी करून मिळणेबाबत | जन माहिती अधिकारी यांचे दि. ९.४.२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर, तसेच दस्तांच्या सी.डी.वर प्रमाणित प्रत देण्याबाबत नोंदणी अधिनियम, १९०८ मध्ये तरतूद नसल्याने अपीलकर्ता यांचे अपील अमान्य करण्यात येत आहे, हा अपिलीय प्राधिकारी यांचा दि. ५.६.२००९ रोजीचा निर्णय योग्य आहे. |
| २ | ८४०/ २००९ /पुणे | श्री. अंबादास चंद्रकांत उंडे ७४/१९, प्राधिकरण, आकुर्डी-चिखली रोड, कोयनानगर, | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१७, चिंचवड गाव, पुणे-३३ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, ५, फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र नोंदणी | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१७ यांच्या कार्यालयात नोंद झालेल्या व स्कॅन केलेल्या एकूण ४४ दस्तांच्या | जन माहिती अधिकारी यांचे दि. १३.४.२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर, तसेच दस्तांच्या सी.डी.वर प्रमाणित प्रत देण्याबाबत नोंदणी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चिंचवड, पुणे-१९ | | कार्यालय इमारत, पहिला मजला, पुणे-१ | प्रती एका सी.डी. वर कॉपी करून मिळणेबाबत | अधिनियम, १९०८ मध्ये तरतूद नसल्याने. अपीलकर्ता यांचे अपील अमान्य करण्यात येत आहे, हा अपिलीय प्राधिकारी यांचा दि. ५.६.२००९ रोजीचा निर्णय योग्य आहे. |
| ३ | ८४१/२००९/पुणे | श्री. अंबादास चंद्रकांत उंडे ७४/१९, प्राधिकरण, आकुर्डी-चिखली रोड, कोयनानगर, चिंचवड, पुणे-१९ | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१८, पार्वती हाईट्स, लांडेवाडी चौक, पुणे-३३ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, ५, फायनान्स रोड, शासकिय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, पहिला मजला, पुणे-१ | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१८ यांच्या कार्यालयात नोंद झालेल्या व स्कॅन केलेल्या एकूण ४६ दस्तांच्या प्रती एका सी.डी.वर कॉपी करून मिळणेबाबत | जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.४. २००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर तसेच दस्तांच्या सी.डी.वर प्रमाणित प्रत देण्याबाबत नोंदणी अधिनियम १९०८ मध्ये तरतूद नसल्याने अपीलकर्ता यांचे अपील अमान्य करण्यात येत आहे, हा अपिलीय प्राधिकारी यांचा दि. ५.६.२००९ रोजीचा निर्णय योग्य आहे. |
| ४ | ८३६/२००९/पुणे | श्री. एम.एन. कोहाड लहरी नगर, मशरफा नर्सरीजवळ, वर्धा | संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-१ | प्रभारी उपसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-१ | फरेरा कमिटीच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील कोष्टी, हलबा कोष्टी, हलबी आदिवासी ठाकूर समाज इ. संदर्भातील एकूण ६ मुद्दयांची माहिती | १. जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.६.२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा दि. १५.७. २००९ रोजीचा निर्णय योग्य आहे. २. मूळ माहिती अर्जातील मुद्दा क्र.५ व ६ बाबतची माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जन माहिती अधिकारी यांनी आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत अपीलकर्त्यास सशुल्क उपलब्ध करून / मिळवून द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यातील एकूण ४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ ( अपील क्र. ८३५/ २००९ /पुणे, ८४०/२००९/पुणे, ८४१/२००९/पुणे, व ८३६/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ८३६/२००९/पुणे प्रकरणी निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**

**दि. २०.८.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खलीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८४७ / २००९/ कोल्हापूर | श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी ११८५/ख-२, दुसरी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर ४१६००८ | अधिक्षक , वेतन व भविष्य निर्वाह निधि पथक (माध्यमिक), कोल्हापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर | जानेवारी २००४ ते २१ मार्च २००९ या कालावधीतील वि.स. खांडेकर प्रशाला कोल्हापूर, हरिहर हायस्कुल, कोल्हापूर यांच्या संदर्भातील एकुण ६ मुद्द्यांबाबतची माहिती. | जन माहिती आधिकारी यांनी दि.१७.४.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्त्यास दिलेले उत्तर योग्य आहे. |
| २ | ८४८ / २००९/ कोल्हापूर | श्री. सागर बाबू कांबळे मु.पो. हसूरवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. | नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | तहसीलदार, तहसीलदार कार्यालय गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | मौजे हसूरवाडी, ता. गडहिंग्लज येथील गट नं. ३९२ मधील (जुना गट नं. ३६२ व स.नं. १२५) श्री.आण्णापा मारुती महार यांचेऐवजी श्री. नागाप्पा आपय्या चिचेवाडी अशी लागलेली नोंद/ नाव कमी करुन मूळ मालक श्री.आण्णापा मारुती महार यांचे नांवे पीक पाण्याचा हिस्सा नोंद करुन फेरफार व ७/१२ उतारा मिळणे | मूळ अर्जातील मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७६९ / २००९/ कोल्हापूर | श्री. स्वस्तीक धनपाल पाटील मु.पो. निमशिरगांव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | जन माहिती आधिकारी, कोल्हापुर पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर | अधिक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली | कोल्हापूर जिल्ह्यातील नद्यांवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी केलेला खर्च, मोजमाप-पुस्तकातील नोंदी, देयके, लाकूड-लोखंड खरेदीचा तपशील, पीक क्षेत्राची मोजणी, पाणीपट्टी आकारणी,वसुली इत्यादी संदर्भातील एकूण पाच मुद्दयांची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे -

**<u>आदेश</u>**

वरील तक्त्यातील एकूण तीन अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. ८४७ / २००९/ कोल्हापूर, ८४८ / २००९/ कोल्हापूर, ७६९ / २००९/ कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-०८-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८५३/ २००९/ सांगली | श्री.सूर्यकांत काका पवार रा.फ्लॅट नं. २०३, ए विंग, आदिनाथ टॉवर, नॅन्सी कॉलनी, बोरिवली (पूर्व), मुंबई ६६ | प्रबंधक, जिल्हा न्यायालय, सांगली | जिल्हा सत्र न्यायाधिश, जिल्हा न्यायालय, सांगली | दिवाणी न्यायालय, विटा येथे अपीलकर्त्याने (वादी) यांनी सादर कलेल्या मूळ अर्जाच्या प्रमाणित प्रती, प्रतिवादीला पाठविलेल्या नोटिसा,त्यास प्रतिवादी कडून अपीलकर्त्यास (वादी) आलेली उत्तरे व नोटिसा, इ. माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ च्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेले दिसत नाही, ते करावे. |
| २ | ८५६/ २००९/ सांगली | श्री. रामदास बाबासाहेब खोत रा. सेक्टर नं.२८, प्लॉट नं. १११, निगडी प्राधिकरण, पुणे ४११० ४४ | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, कवठेमहाकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली | अपर पोलीस अधिक्षक, सांगली, जिल्हा सांगली | श्री. बाबासाहेब बिरु खोत रा. करोली, रामपूरवाडी यांनी बेकायदेशीर वृक्षतोड केल्याबद्दल | मागणी केलेल्या माहितीचे सन २००३ सालातील पोलीस ठाणे अर्ज रजिस्टर नष्ट करण्यात आलेले असल्याने सन २००३ सालातील अर्जाच्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि. १३/१०/२००३ रोजी केलेल्या लेखी तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईच्या अहवालाची प्रत | नोंदीचा आढळ होत नाही, हे जन माहिती अधिकारी यांनी दि. १३/५/२००९ रोजी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेले आदेश योग्य आहेत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ ते २ (अपील क्र.८५३/ २००९ / सांगली, ८५६/ २००९ / सांगली ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १८.०८.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८५४/ २००९/ सोलापूर | श्री. संभाजी निवृत्ती काळे माढा रोड, मु. पो.कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | गाव कामगार तलाठी, मु. पो.भोसरे ता. माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, ता. माढा, जि.सोलापूर | मौजे भोसरे येथील माहिती खोटी असल्याचे अपिलकर्त्याने म्हटले आहे. परंतू गट नं. ३४ या जमिनीतून बायपास रस्ता झाला त्या रस्त्याकरिता संपादित केलेल्या शेतजमिनीचा तपशील | माहिती खोटी असल्याचे अपिलकर्त्याने म्हटले आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीतील खोटे काय, हे अपील - कर्त्याने स्पष्ट केलेले नाही. माहिती खोटी असल्याचे अपिलकर्त्याने म्हटले आहे. अपीलकर्त्याने ते पुराव्यानिशी दाखल करणे आवश्यक आहे. |
| २ | ८५५/ २००९/ सोलापूर | श्री. संभाजी निवृत्ती काळे माढा रोड, मु. पो.कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | गाव कामगार तलाठी, मु पो.कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, जि.सोलापूर | श्री. संजय महादेव डिकोळे यांचे कडून तात्पुरता सारा वसूल केला जातो त्याचा सिटी सर्व्हे नं. किती, त्या जागेचे क्षेत्रफळ किती, चतु:सिमा कोणत्या, इत्यादी माहिती | १) माहिती खोटी असल्याचे अपिलकर्त्याने म्हटले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीतील खोटे काय, हे अपीलकर्त्याने स्पष्ट केलेले नाही. २) कुर्डुवाडी नगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे रेकार्ड सिटी सर्व्हे कार्यालयात दिलेले असल्याने सिटी सर्व्हे कार्यालयाशी संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरानुसार अपीलकर्त्याने माहिती मागावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८५८/ २००९/ सोलापूर | श्री. परमेश्वर सिद्राम बनसोडे मु. पो. जेऊर, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, जि. सोलापूर | तहसीलदार, अक्कलकोट जि.सोलापूर | नवीन शिधापत्रिका उपलब्ध होते की नाही,जुनी शिधा - पत्रिका बंद आहे, त्यावर धान्य व केरोसीन मिळेल का, उत्पन्नाचा दाखला शिधापत्रिकाविना मिळेल का, इत्यादी | मूळ अर्जान्वये खुलाशाची मागणी केली असून मूळ मागणी ही रेशनकार्ड मिळण्याबाबतची असल्याने ही बाब प्रशासकिय कार्यवाहीची आहे. मात्र अपिल -कर्त्याच्या शिधापत्रिके -बाबतच्या (कधी देणार, विलंबाची कारणे इ.) कार्यवाहीची पूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आठ दिवसांत द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. ८५४/२००९/सोलापूर,८५५/२००९/सोलापूर, व ८५८/२००९/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. ८५८/२००९/सोलापूर मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत सादर करावा. अन्यथा सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**

**दि.२६.०८.२००८**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ